साप्रवि/गट-८(रवक्ष)/न.क्र.३२७/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
**मुंबई - ४०००१९.**

## प्रशासकीय परिपत्रक क्र.०६ दिनांक १४/१०/२००५

**विषय**: मागासवर्गाच्या जाती प्रमाणपत्राच्या वैधतेअभावी स.सा.आ.७४ (क) दिनांक ३०.४.७४ अनुसार द्यावयाच्या उच्च वेतनश्रेणीच्या लाभाबाबत.

**वाचा**: १) प्रशासकीय परिपत्रक क्र.२०२ (मावक) दिनांक २९/११/१९९६
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२३९ (मावक) दिनांक १४/१०/१९९७
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.४२४ (मावक) दिनांक ३०/७/२००४
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.४४२ (मावक) दिनांक १७/११/२००४

-----

प्रशासकीय परिपत्रक क्र.२३९ (मावक) दिनांक १४/१०/१९९७ अन्वये अधिसूचित केल्यानुसार अनुसूचित जमातीसाठीच्या राखीव पदावर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे ज्या कर्मचा-याला म.रा.वि.मंडळाच्या सेवेत प्रवेश मिळाला आहे त्या कर्मचा-याला उच्च पदावर पदोन्नती देण्याअगोदर त्याच्या जाती प्रमाणपत्राची, शासन नियुक्त जाती प्रमाणपत्र समितीकडून वैधता पडताळणी केली जाते आणि त्याच्या जाती प्रमाणपत्राची विधीग्राहयता निश्चित झाल्यावरच त्याला पदोन्नती दिली जाते. तथापि, स.सा.आ.७४ (क) दि.३०.४.७४/१११ (क) दि.१३.५.८२ अनुसार उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यासाठी संबंधित कर्मचा-याने सादर केलेल्या अनुसूचित जमातीच्या जाती प्रमाणपत्राची विधीग्राहयता निश्चित करुन घेणे आवश्यक आहे किंवा काय याबाबत काही कार्यालयांकडून विचारणा करण्यात आली होती. या संदर्भात पुढील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

एक) विहित वर्षांचा सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर म.रा.वि.मंडळ वर्गीकरण व सेवा प्रवेश विनियम व अन्य संबंधित विनियमांमध्ये विहित केलेल्या नियमांनुसारच्या पूर्वावश्यकतांची एखादा कर्मचारी पूर्तता करीत असेल तर, पदोन्नतीच्या मार्गाची किंवा रिक्त पदाची अनुपलब्धता या कारणांमुळे कर्मचा-याची काहीही चूक नसताना त्याच्या बाबतीत उद्भवलेली गतिकुंठीतता (De-Stagnation) नाहीशी करण्याची उपाययोजना म्हणून स.सा.आ.७४ (क) दि.३०.४.७४ किंवा स.सा.आ.१११ (क) दि.१३.५.८२ अनुसार संबंधित कर्मचा-याला उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येतो. तथापि, हा लाभ देताना मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणाची बाब विचारात घेतली जात नाही.

दोन) स.सा.आ.७४(क)/१११ (क) अनुसार उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत पदोन्नतीच्या पदावर आपोआप समावेशन करुन घेण्याची तरतूद नाही.

तीन) त्यामुळे संबंधित कर्मचारी जर स.सा.आ.७४ (क)/१११ (क) मधील इतर अटींची पूर्तता करीत असेल तर, मागासवर्गीय जाती प्रमाणपत्राची विधीग्राहयता निश्चित झालेली नसली तरीही तो उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यासाठी पात्र ठरु शकेल.

चार) तथापि, उच्च वेतनश्रेणीचा लाभ देताना जाती प्रमाणपत्राच्या विधीग्राहयतेखेरीज इतर कोणत्याही प्रकारचे शिथिलीकरण करण्यात येऊ नये. म्हणजेच थोडक्यात, संबंधित मागासवर्गीय कर्मचा-याच्या बाबतीत उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यासाठीचे प्रकरण विचारात घेताना खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना लागू करावयाचे मापदंड/ निकष लावण्यात यावेत.

पाच) जाती वैधता प्रमाणपत्राच्या अभावी उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेला असला तरी अशा कर्मचा-याचा पदोन्नतीसाठी विचार करताना मात्र जाती प्रमाणपत्राची विधीग्राहयता निश्चित करुन घेणे आवश्यक राहील. तसेच, उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळाला तरी संबंधित कर्मचा-याला पदोन्नतीसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही.

सहा) उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचा-याचे मागासवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र शासन नियुक्त प्राधिकरणाकडून अवैध ठरविण्यात आले तर संबंधित कर्मचा-याच्या विरुध्द नियमानुसार आवश्यक ती कारवाई करावी. तथापि, उच्च वेतनश्रेणी दिल्यामुळे कर्मचा-याला अगोदर झालेल्या आर्थिक लाभाची वसुली करु नये.

३. जाती वैधता प्रमाणपत्राअभावी स.सा.आ.७४ (क) अनुसार उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यासाठी प्रलंबित ठेवण्यात आलेली प्रकरणे वरील स्पष्टीकरणानुसार निकाली काढावीत.

४. या विषयासंदर्भात यापूर्वी निर्गमित केलेल्या उपरोक्त स्पष्टीकरणाशी संदिग्ध/विसंगत असलेल्या सूचना आता निष्प्रभावित ठरविण्यात येत आहेत.

(स्वाक्षरी)

**महा व्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

प्रति :-

प्रेषण यादीनुसार

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित

मधील कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाच्या अधिका-यांपर्यंत.

E/Adm.Cir.G.574